महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव

**GOVERNMENT MEDICAL COLLEGE, DHARASHIV**

कोविड-19 इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) 413 501

**e-mail:** deangmcosmanabad@gmail.com


जा.क्र.शावैमधा/यंत्रभांडार/सोलार हिटर-वसतीगृह/ 481 /२०२६, दिनांक: 12 /०२/२०२६

प्रति,

-------------------------

-------------------------

-------------------------

**विषय :-** वैद्यकीय विद्यार्थी वसतीगृहाकरिता आवश्यक साहित्य व साधनसामग्री खरेदी करणेबाबत.

**संदर्भ :-** १) कुलमंत्री मुलींचे वसतीगृह यांचे मागणीपत्र क्र.१९/२०२६, दि.२०/०१/२०२६.

२) कुलमंत्री मुलांचे वसतीगृह यांचे मागणीपत्र क्र.२३/२०२६, दि.२३/०१/२०२६

३) दिनांक १० /०२/२०२६ रोजीची कार्यालयीन मंजुर टिप्पणी.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, नवनिर्मीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय परिसरातील पदवीपुर्व वैद्यकीय विद्यार्थी वसतीगृहामध्ये विद्यार्थ्यांच्या संख्येच्या दृष्टीने गरम पाणी उपलब्ध करुन देणेकामी सोलार वॉटर हिटर यंत्रणा खरेदी करुन पुरवठा/ प्रस्थापित करण्याची संदर्भ क्र.१ ते ३ अन्वये आवश्यकता आहे.

तरी मागणीप्रमाणे आवश्यक साहित्य व साधनसामुग्री पुरवठा/ प्रस्थापित करणेकामी पात्र निविदा धारकांकडुन विहित अटी व शर्तींना अनुसरुन दि.१२-/०२/२०२६ ते दि.१८-/०२/२०२६ कालावधीमध्ये दरपत्रके मागविण्यात येत असल्याने, इच्छुक निविदाधारकांनी खालील नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफा मध्ये आपले दरपत्रक सादर करावेत.

**सोबत:** दरपत्रक नोटीस व विनिर्दिष्ट्ये जोडली आहेत.

(डॉ. शैलेंद्र द. चौहान)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव.

प्रत:- १) सुचना फलक जाहीर नोटिस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव.

२) संकेतस्थळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव.

३) कुलमंत्री, मुलींचे/ मुलांचे वसतीगृह, शा.वै.म., धाराशिव.

**कार्यालयाचा पत्ता**

**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**
**जिल्हा सामान्य रुग्णालय आवार,**
**धाराशिव-४१३५०१**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव

## दरपत्रक नोटिस

नवनिर्मीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय परिसरातील पदवीपुर्व वैद्यकीय विद्यार्थी वसतीगृहामध्ये विद्यार्थ्यांच्या संख्येच्या दृष्टीने गरम पाणी उपलब्ध करुन देणेकामी सोलार वॉटर हिटर यंत्रणा खरेदी करुन पुरवठा/ प्रस्थापित करण्याची संस्थेस आवश्यकता आहे. याकामी निविदा धारकाकडुन दरपत्रके मागविण्यात येत असुन दि.१२/०२/२०२६ ते दि.१८/०२/२०२६ पर्यंत इच्छुक निविदाधारकांनी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफा मध्ये आपले दरपत्रक करार सादर करावेत.

**दरपत्रके सादर करतेवेळी अधिकृत लेटरहेड वर खालील प्रमाणे विहित नमुन्यात तसेच अटी व शर्तींना अनुसरुनच माहिती सादर करावी अन्यथा निविदा प्रक्रियेतुन अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

| अ.क्र. | साहित्याचे नाव | विनिर्दिष्ट्ये (Specifications) | परिमाण | किंमत नमुद करावी (कर अतिरिक्त) |
|---|---|---|---|---|
| ०१ | ५०० एल.पी.डी. सोलर हिटर | २mm Thickness | Per nos. | |
| ०२ | २००० लिटर पाण्याची टाकी | ३ layers with fitting wages | Per nos. | |
| ०३ | लोखंडी स्टॅण्ड | ४ x २ inch, Top १ inch, Patti Height ६ ft, width ५ft. | Per nos. | |
| ०४ | सोलर ते बाथरुम पर्यंत पाईपलाईन | CPVC-UPVC Pipeline with fitting material & wages | Per feet | |

**अटी व शर्ती:**

०१) दरपत्रक मोहरबंद लिफाफा दिनांक १८/०२/२०२६ पर्यंत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावेत. जाहिर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत/ ग्राह्य धरले जाणार नाहीत.

०२) सुचना फलक/ संकेतस्थळावरील जाहिर नोटीस प्रमाणे इच्छुक कंपनीस दरपत्रक मोहरबंद लिफाफा सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे. दरपत्रक मोहरबंद **लिफाफा "अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव" यांचे नावे** विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा.

०३) दरपत्रक मोहरबंद लिफाफ्यावर **"सोलार हिटर यंत्रणा पुरवठा करणे करिता दरपत्रके"** तसेच मोहरबंद लिफाफा जमा करण्याचा **अंतिम दिनांक** दरपत्रधारकाच्या नावाचा **शिक्का** इत्यादी नमुद असणे आवश्यक आहे.

०४) दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्त्ऐवज: (Document) **जीएसटी (GST) क्रमांक असलेल्या अधिकृत लेटरहेडवर** दरपत्रक सादर करावे. त्यासोबत

- जीएसटी प्राधिकृत प्रत
- पॅन कार्ड
- शॉप ॲक्ट
- शासकीय कार्यालयामध्ये काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र (Valid PO)
- स्थळ पाहणी (site visit) रिपोर्ट **"ANNEXURE-A"** (सोबत नमुना जोडला आहे)
- एकल दरपत्रक धारक असल्याबाबतचे हमीपत्र **"ANNEXURE-B"** (सोबत नमुना जोडला आहे).
- इत्यादी सर्व दस्तऐवज जोडावे **(दिलेल्या क्रमाने जोडण्यात यावेत)**.

०५) निविदा घोषित झाल्यानंतर पात्र न्युनतम दरधारक यांनी पुरवठा आदेश प्राप्त होताच, उपकरणाचा वॉरंटी कालावधी व देखभाल यासंबंधी रु.५००/- च्या बॉण्ड पेपरवर नोटरीसह हमीपत्र सादर करावे.

०६) सर्वात कमी दर सादर करणाऱ्या पात्र निविदाधारकाचे दर हे पूढिल ०६ महिन्यांकरिता गोठविण्यांत येतील. कार्यालयाच्या आवश्यकतेनूसार वेळोवेळी त्याच दराने सामुग्री विहित वेळेत (०७ दिवसात) पूरवठा करणे बंधनकारक राहिल.

०७) अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटी अथवा शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण/पुर्वसुचना न देता नाकारणे तसेच कोणत्याही स्तरावर निविदा प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**नोंद:- सदर दर पत्रके मा. अधिष्ठाता यांचे दालनात उघडण्याची वेळ दिनांक. २०/०२/२०२६ रोजी ११.३० वाजता राहिल. सदर नियोजित वेळेत कोणताही बदल झाल्यास निविदाधारकांना तशी पुर्वसुचना देण्यात येईल.**

(डॉ. शैलेंद्र चौहान)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव

# ANNEXURE-A

/ /2025

To
**The Dean,**
**Government Medical Collage,**
**Dharashiv-413501**

**Sub:** About subbmition of Site Visit Report.

**Ref:** Bid/Tender/Quotation Number:

**Bidder Name :**

Our Engineer/ Office Person have Visited the Site Mentioned Below in Consideration and Have understand All technical Details and local condition prevailing for Finishing. The wok and ready to complete the supply, Installation and training work (as applicable).

GPS Photo of site visited Engineer with Government Medical collage employee provided by collage.

**Signature with Stamp & Seal**
**OEM/ Othorised Dealer**

(डॉ. चेतन राजपूत)
सहयोगी प्रध्यापक, शरिरक्रियाशास्त्र
तथा कुलमंत्री-मुलांचे वसतीगृह
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव

(डॉ. चारुशिला हलगरकर)
विभाग प्रमुख, सुक्ष्मजीवशास्त्र
तथा कुलमंत्री-मुलींचे वसतीगृह
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव

| |
|---|
| एकल दरपत्रक अधिकृत विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांचे लेटरहेडवर |

Letter No. Date :-

प्रति
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव.

विषय :- एकल दरपत्रक सादर करणेसंबंधीचे हमीपत्र सादर करणेबाबत...

संदर्भ :- आपले दरपत्रक मागणी पत्र
क्रमांक. ____________________
दिनांक ____________________

महोदय

संदर्भांकित दरपत्रक मागणी पत्रानुसार मागणी करण्यात आलेले एकल दरपत्रक सादर करण्यासंबंधीचे हमीपत्र मी खालील प्रमाणे सादर करीत आहे.

## हमीपत्र (Undertaking)

याद्वारे हमी देतो की, दरपत्रक प्रक्रियेसाठी एकच दरपत्रक सादर करीत आहे. आमच्याच फर्मशी निगडीत असलेल्या कुठल्याही व्यक्तीच्या नावे किंवा अप्रत्यक्षपणे केवळ आम्हास लाभ होईल, अश्याप्रकारे दुसरे दरपत्रक दरपत्रकप्रक्रियेमध्ये सादर केलेला नाही. तसेच माझा/आमचा आपल्या कार्यालयातील खरेदी प्राधिकाऱ्यांशी कुठलेही हितसंबंध नाही.

उक्त बाब भविष्यात असत्य/खोटी आढळुन आल्यास, सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी/आम्ही पात्र असू. तद्संबंधी माझी/आमची कुठलीही हरकत राहणार नाही. अशी याद्वारे हमी देत आहे.

| |
|---|
| अधिकृत वितरकाचे नाव व स्वाक्षरी,<br>शिक्का अणि मोहर<br>Authorized Person Name,<br>Signature<br>with Stamp and Seal |